# एड्स




## होमिओपॅथी चिकित्सा व उपचार



डॉ. अमरसिंह निकम

Acquired Immunodeficiency Syndrome (एड्स) किंवा Human Immunodeficiency Virus (एच.आय.व्ही.) HIV विषाणुमुळे बाधीत झालेली अवस्था आहे.

हा असुरक्षीत यौन संबंधामुळे पसरतो. याची लागण HIV बाधीत व्यक्तीच्या रक्तामार्फत, वीर्यामार्फत, आईच्या स्तनपानातून, दूषित लसीकरणामार्फत व प्रसुतीच्या वेळेस आईकडून बाळाला होऊ शकते. HIV चे विषाणू प्रतिकार संस्थेतील Helper T cells वर ताबा मिळवतात. त्यामुळे CD 4 ची पातळी कमी होते. Helper T cells या शरीरातील सर्वात सक्षम विषाणूंशी लढा देणाऱ्या पेशी आहेत. या सैनिक पेशींवरील हल्ल्यामुळे शरीर कमकुवत होत जाते.

सुरुवातीला बाधीत काळात व्यक्तीमध्ये फ्लू सारखी लक्षणे दिसून येतात. ह्यानंतर बराच काळ HIV बाधीत पेशंटमध्ये काहीच लक्षणे दिसून येत नाही. ह्यालाच Window Period म्हणजे अवगुंठित काळ म्हणतात. जसे जसे या विषाणूचे संक्रमण वाढत जाते, तशी तशी शरिराची प्रतिकारक्षमता कमी कमी होवून व्यक्ती कुठलाही आजारांना बळी पडते. क्षयरोग, न्युमोनिआ, फुप्फुसाचा क्षय, अन्ननलिकेला बुरशीमुळे सुज येणे. त्वचेचा कर्करोग, कातडीचे आजार, नागीण, कावीळ असे अनेक आजार होतात. या अशा नव्या जंतू संसर्गांनी शरीर दुबळे बनते. अनेक रोगांचे जंतू शरिरावर ताबा मिळवतात. या विशिष्ट चिन्हे व लक्षणे असलेल्या अवस्थेला एड्स संबोधितात.

HIV ची लागण झाली आहे की नाही हे फक्त रक्त तपासणी वरुनच (Eliasa Test) समजते. HIV चे संक्रमण तीन टप्प्यात होते.

**१) तीव्र संक्रमण :-**

- HIV संक्रमणाच्या प्रारंभिक काळात जी लक्षणे दिसतात त्याला तीव्र HIV किंवा तीव्र Retroviral Syndrome असे म्हणतात. खूप लोकांमध्ये २-४ आठवड्यात Influenza , nyuclocious सारखी लक्षणे दिसतात.

- सतत ताप येणे, अवधान येणे, शरीरावर चट्टे येणे. ही लक्षण साधारण आजारांसारखी (Influenza ) असल्यामुळे बऱ्याचदा लक्ष्र चे निदान या काळात होत नाही. त्यामुळे जर सतत ताप येत असेल तर तसेच थकवा येवून वजन घटत असेल तर HIV साठी रक्ताचे परीक्षण केले पाहिजे अथवा तपासणी केली पाहिजे.

**२) लक्षणविरहीत काळ :-**

- प्रारंभिक काळानंतरची ही पुढची पायरी आहे. उपचारांशिवाय HIV चे संक्रमण ३ ते १० वर्ष ( सरासरी ८ वर्ष ) राहते. या टप्प्यात काहीच लक्षणे आढळत नाही. शेवटच्या टप्प्यात वजन घटणे, जुलाब, अंगदुखी, ताप अशी लक्षणे दिसून येतात. या काळात Eliasa Test सकारात्मक येते. काही HIV संक्रमित व्यक्तीमध्ये लागण झाली आहे की नाही हे Viral load वरून समजते.

३) AIDS :-

- सततच्या संक्रमणामुळे प्रतिकारक्षमता कमी होऊन CD4 पेशींच्या संस्थेत घट (> 200 /Ml) होतो. यामुळे शरीर संधिसाधू रोगांमुळे बळी पडते. उपचारांअभावी HIV चे संक्रमन १० वर्षांमध्ये विकसित होते. सगळ्यात प्रारंभिक अवस्थेत न्युमो सिस्टीक निमोनिआ होतो. अन्न नलिकेला बुरशीचा दाह ( Oesophagial Candiasis ) होतो.

- सतत जीवाणू, विषाणू व बुरशी अशा परजीवीचे शरिरावर संक्रमण होते. (की जे सामान्य माणसात चांगल्या प्रतिकारशक्तीमुळे होत नाही.)

**एड्सची लक्षणे:**

१. सतत रात्रीच्या वेळी ताप येणे, घाम फुटणे.

२. वजन घटणे, पटकन कमी होणे.

३. जांघेत किंवा मानेत अवधान येणे.

४. खूप दिवस म्हणजे एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस जुलाब होणे.

५. त्वचेवर, तोंडात, नाकात , गुलाबी लालसर चट्टे दिसणे.

६. सततच्या विसराळूपणा

- काही पेशंटमध्ये एच.आय.व्हीचे संक्रमण झाले तरी काहीच लक्षणे आढळून येत नाही.

- एड्ससाठी होमिओपॅथित खूप चांगले औषधोपचार आहेत. तरी देखील आजार होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**: केस :**

ही एका HIV बाधीत रुग्णाची केस आहे. तो एका डॉक्टरांसोबत आला होता. जो या आजारामुळे पूर्णपणे गळून गेला होता. तो खूप अशक्त, मरगळलेला होता. अशक्तपणामुळे तो फार काळ एका जागेवर बसू शकत नव्हता. HIV बरोबरच त्याला फुप्फुसाचा क्षयरोग (T.B) झाला होता. त्याच्या मेंदूवर देखील विपरीत परिणाम होत चालला होता. त्यामुळे त्याची शुद्ध हरपत चालली होती. (Spleenomegaly) स्प्लीहा वाढली होती व ( cerebral Atrophy ) होती. HIV विषाणू आणि क्षय रोगांच्या जंतूनी त्याच्या शरीरावर संपूर्ण हल्ला केला होता. तो अतिशय नाजुक अवस्थेत होता. त्याला डॉक्टरांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते की कुठलेही औषधोपचार याला वाचवू शकत नाही. पेशंट खुर्चीवर पुढे रेलून बसला होता, तो स्वतःलाच सावरण्याचा प्रयत्न करीत होता. त्याची बायको त्याला आधार देत होती. तो अर्ध जागरूक अवस्थेत होता. त्याला बोलण्याचाही त्राण नव्हता. त्याला मी तोंड उघडून जीभ दाखवण्यास सांगितले त्याला त्याचेही अवसान नव्हते. त्याची जीभ पांढऱ्या पडद्याने आच्छादलेली होती. तोंडाच्या आतील त्वचा ही नारळाच्या आतील कवटीप्रमाणे पांढरी शुभ्र दिसत होती. तोंडातून लाळ टपकत होती व घाणेरडा वास येत होता. त्याला घशाच्या आणि अन्न नलिकेच्या म्हणजे बुरशीचा प्रादुर्भाव झाला होता. त्याचा CD4 पातळी 100/mm3 पेक्षा कमी होता. त्याची प्रतिकारक्षमता पूर्णपणे ढासळलेली होती. त्याच्या पूर्ण केसची माहिती त्याच्या बायकोने व डॉक्टरांनी दिली. कारण तो पूर्ण शुद्धीत नव्हता.

**तक्रारी :**

१. अशक्तपणा ७-८ महिन्यांपासून.

- चालल्यानंतर खूप वेळ बसल्यावर अशक्तपणा वाढणे.

- डाव्या कुशीवर झोपल्यावर बरे वाटणे.

२. अनैच्छिकरित्या लघवीस व पडसाकडला होणे २ ते ३ महिन्यांपासून.

- झोपेच्या वेळेस हा त्रास वाढणे.

३. हात थरथरणे.

४. अधून मधून ताप येणे, सात महिन्यांपासून.

- तापाच्या वेळेस तहान वाढणे.

- तापात बरळणे.

- तापात अशक्तपणा वाढणे.

५. सतत उलट्या होणे व भूक न लागणे पाच महिन्यांपासून.

६. वजनात घट - १८ किलो वजन आठ महिन्यांत कमी झाले.

**विशेष माहिती :**

१. जेवणात तिखट, फळांची व दुधाची आवड.

२ . गोड व स्निग्ध पदार्थ नावड

३. खूप तहान लागण्याची प्रवृती

४. अनैच्छिकरित्या लघवीस व पडसाकडला होणे

- पडसाकडला अतिशय पिवळसर व दुर्गंधीयुक्त होणे.

५. अतिशय घाम येण्याची प्रवृत्ती.

६. उष्ण प्रवृत्ती

७. सतत पंख्याची आवड

८. गार वाऱ्यात व मोकळ्या वाऱ्यात बरे वाटणे.

**स्वभाव :**

**१. तुमचा स्वभाव कसा आहे ?**

- अशक्तपणामुळे पूर्ण माहिती त्याच्या बायकोने व नातेवाइकांनी दिली. बायकोने सांगितले की यांचा स्वभाव नम्र, शांत व काळजीवाहू आहे. ते नेहमी दुसऱ्यांना मदत करण्यासाठी तत्पर असतात. ते खूप जबाबदार व इतरांशी जुळवून घेऊ शकतात.

**२. त्यांना राग कधी येतो?**

- जर कोणी बेजबाबदारपणे वागले तर त्यांना राग येतो पण ते कधीच ओरडत नाही व मारत नाही ते समजावून सांगतात.

**३. त्यांच्या लहानपणाविषयी सांगा ?**

- त्यांना एक भाऊ व तीन बहिणी आहे. त्यांच्यामध्ये ते सर्वात धाकटे आहे. त्यांचा स्वभाव मनमिळावू आहे व लोकांमध्ये रहायला आवडते. त्यांच्या वडिलांचे निधन लवकर झाल्यामुळे त्यांना पैशाची अडचण होती. आर्थिक परिस्थीतीमुळे त्यांना त्यांचे शिक्षण बारावीतच सोडून द्यावे लागले.

**४. त्यांच्या व्यवसायाबद्दल सांगा ?**

- त्यांचे धान्याचे दुकान आहे जे चांगले चालत होते पण या आजारामुळे त्यांनी दुकानात जाणे बंद केले.

**५. त्यांचे घरातल्यांशी नातेसंबध कसे आहे ?**

- त्यांची सगळ्यांशी खूप जवळीक आहे व सगळ्यांची ते खूप काळजी करतात. सुरुवातीला त्यांचे बहिणीशी दृढ नाते होते पण जेव्हापासून त्यांना आजाराचे समजले तेव्हापासून बहिणींनी त्यांना दुर्लक्षित केले. याचा त्यांना खूप भावनिक त्रास होतो. दोन वर्षापूर्वी त्यांच्या आईला लखवा झाला. यामुळे आर्थिक टंचाई अधिक वाढली. आईच्या आजाराचेही टेन्शन आले.

**६. जास्त चिंता कशाची आहे ?**

- त्यांना व्यवसायाची, मुलांच्या भविष्याची व कुटुंबाची चिंता आहे. या आजारामुळे ते स्वतःला दोषी समजतात व बायको सोडून जाईल असे वाटते. या आजारामुळे त्यांच्या मनात आत्महत्तेचे विचार येतात. पण कौटुंबिक जबाबदारीमुळे ते टाळतात. त्यांना आधी मिळून मिसळून रहायला आवडायचे. पण आता एकटे रहायला आवडते.

**संपूर्ण व्यक्तीमत्व : -**

१. अन्न गिळायला त्रास होणे.

२. तोंडातून लाळ गळणे व दुर्गंध येणे.

३. उष्णतेचा त्रास वाटणे व पंख्यामुळे गार वाऱ्यात व मोकळ्या हवेत बरे वाटणे.

४ भूक न लागणे व झोप न येणे.

५. खाण्यामध्ये तिखट फळे व दुधाची आवड

६. अनैच्छिकरित्या लघवीस व पडसाकडला होणे

७. त्याग भावना

८. जबाबदार व्यक्तीमत्व

९. कर्तव्यदक्ष

१०. आत्मकेंद्रित

११. एकटेपणाची आवड

१२. विसराळूपणा

१३. मरगळलेपणा

१४. काळजी वाहू

१५. पश्चाताप

१६. कुटुंबांविषयी व आई विषयी काळजी

१७. आजाराचे कारण लवकर व खूप जबाबदारी

१८. उष्ण प्रकृती

**प्रतिसाद : -**

- त्याच्या अवस्थेवरून मला व त्याच्या बायकोला खूप काळजी वाटत होती. आजारामुळे त्याचे शरीर अत्यंत जीर्ण आणि क्षीण झाले होते. परतीच्या प्रवासात तो घरी जाईल का नाही अशी शंका वाटत होती. त्याच्यासोबत आलेला डॉक्टर देखील अतिशय चिंतीत आणि गंभीर झाला होता. परंतु होमिओपॅथिच्या औषधाने त्याच्या आयुष्याला आश्चर्यकारक वळण दिले. वरील लक्षणांनुसार एक (Single Remedy) होमिओपॅथिक औषध पेशंटला चालू केले आणि तो काही वेळातच गाढ झोपी गेला त्याची बायको खूप खूश झाली. कारण तो गेले कित्येक दिवस गाढ झोपू शकला नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर तो खूप प्रसन्न वाटत होता. त्याची मळमळ थांबली आणि त्याने बायकोकडे चहा मागितला. घरी असताना त्याला चहा पिण्यासाठी १५-२० मिनिटे लागत होते. घशातील बुरशीच्या प्रादुर्भावामुळे. पण आता त्याने एका मिनिटात पूर्ण चहा संपवला. सगळेजण या औषधाच्या प्रतिसादावर खूप खूश झाले. परतीच्या प्रवासात त्याने बऱ्याच दिवसाने जेवणाचा आस्वाद घेतला. तीन महिन्यांनी तो फेर तपासणीसाठी आला होता. तो अतिशय सुदृढ व प्रसन्न दिसत होता. त्याचे व्यक्तीमत्व एवढे बदलले होते की त्याला आम्ही ओळखू शकलो नाही. त्याच्या जिभेवरचे पांढरे आवरण (Fungal Infection ) पूर्ण गेले होते.

तीन महिन्यांत २६ किलो वजन वाढले होते. त्याच्या सगळ्या तक्रारी नाहिश्या झाल्या. त्याला झालेला आजार देखील बरा झाला होता. त्याची भूक पूर्ववत झाली होती. त्याचे दैनंदिन जीवन देखील पूर्ववत झाले व तो आपल्या व्यवसायात आणि कुटुंबात रमू लागला.

# आपलं व्यासपीठ

## महामानवांना डोक्यावर घेण्यापेक्षा डोक्यात घ्या...



महाराष्ट्रात अनेक थोर नेत्यांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. त्यांनी देशासाठी व लोकांसाठी दिलेले विचार हे मोलाचे आहेत. त्या विचारांचे अनुकरण करणे हिच त्या महात्म्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. परंतु, आजकालच्या तरुण पिढीकडून साजरी केली जाणारी महामानवांची जयंती पाहिली की मन दुःखी होते. विशेषतः शिवजयंती, आंबेडकर जयंती या दिवशी तरुण मोठ मोठे डि.जे. लावून महापुरुषांच्या प्रतिमांची मिरवणूक काढतात. पण त्या मिरवणुकीमध्ये लावली जाणारी विचित्र गाणी व बिभत्स नृत्य पाहिले की प्रश्न पडतो, हे देशाचे भावी नागरिक आपला देश कसा चालवतील? महामानवांना डोक्यावर घेण्यापेक्षा त्यांना डोक्यात घ्या त्यांचे विचार आत्मसात करा, ते देशाला आणि समाजाला मार्ग दर्शक ठरतील, या मिरवणुकीमुळे ध्वनीप्रदुषण तर होतेच पण रहदारीला मोठा अडथळा निर्माण होतो. मद्यधुंद अवस्थेत नृत्य करणारी काही मंडळी तेथेच भांडणे मारामाऱ्या करतात.

**भिवाजी पां. कदम, न्हावरे ता. शिरुर जि. पुणे**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

# यूथ Talkers

**सनील गाडेकर**

**नैऋत्य मोसमी पाऊस (मान्सून) येत्या एक जूनला किंवा त्याच्या जवळपास केरळ किनारपट्टीवर धडकेल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) रविवारी व्यक्त केला आहे. यावर्षी मान्सून सरासरीपेक्षा कमी म्हणजे ९३ टक्क्यांपर्यंत पडणार असल्याचा अंदाज यापूर्वीच वर्तविण्यात आला असला, तरी मान्सूनची पहिली धडक सर्वसाधारणतः अपेक्षित व नियोजित वेळेतच होईल, असा अंदाज आहे. मात्र, तो दरवर्षी खरा ठरतोच असे नाही. हवामान खात्याच्या अंदाजाबाबत युवकांनी दिलेल्या या प्रतिक्रिया...**

### अंदाज चुकण्यास आपणच जबाबदार...



पाऊस सुरू होण्याच्या एक महिना आधीच हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविला आहे आणि तो खोटा ठरला तरी त्यात त्यांची काही चूक नाही. कारण माणसाच्या अतिरेकी वागणुकीमुळेच सध्या निसर्गाचे चक्र बदलले आहे.

**रुचा अत्रे**

### ज्योतिषाचे अंदाज खरे ठरतात, पण...



हवामान खाते गेल्या अनेक वर्षांपासून अंदाज वर्तवत आहे. मात्र त्यांच्या अंदाजाप्रमाणे पाऊस होतच नाही. त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे पाऊस होत नाही, यावर शिक्कामोर्तब झाला आहे. आजकाल ज्योतिषाने वर्तविलेले अंदाज खरे ठरत आहेत. मात्र, तंत्रज्ञान आणि यंत्राचा वापर करून वर्तविलेले अंदाज फोल ठरताहेत. हवामानाचे अंदाज हे चार ते पाच दिवसांपुरते मर्यादित असतात. एक महिन्यापूर्वीचा अंदाज खरा ठरेल का, याबाबत शंका आहे.

**पुरुषोत्तम गोडसे**





